अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

▸ वर्ष : २४ वे ▸ अंक : ११७ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२

www.surajyadigital.com । शनिवार, दि. २४ जानेवारी २०२६ ।




# उघडलं मागचं दार!

## झेडपीत ६, पं. स. मध्ये २७ जणांचे पुनर्वसन

## औट घटकेच्या नाराजांचं येणार राज्य!

✔ सोलापूर/प्रतिनिधी

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या राणांगणात राजकीय तडजोडीमुळे ज्या इच्छुक नेते मंडळींची उमेदवारी डावलण्यात आलीय त्यांच्यासाठी पाठीमागचा दरवाजा खुला करण्याचा निर्णय सरकार घेत आहे. त्यामुळे औट घटकेचे नाराज आत्ता जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यावर राज्य करण्यासाठी मागील दरवाज्यातून प्रवेश करण्यास सज्ज होताहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये उमेदवारी देण्याच्या निकषांवर बहुतांश ठिकाणी निवडून येण्याची क्षमता असणाऱ्या सर्वच इच्छुक चेहऱ्यांना उमेदवारी देणं पक्षाला शक्य होत नाही. उमेदवारीशिवाय जे काही चेहरे राहातात, ते नाराज होऊ नयेत, त्यांच्या नाराजीचा फटका निवडणुकीमध्ये पक्षाला बसू नये, म्हणून त्यांच्या मनधरणीचा प्रयत्न पक्षांकडून होतो. त्यांचा रुसवा-फुगवा काढण्यासाठी भविष्यात 'ॲडजेस्टमेंट करुया' असा शब्द दिला जातो. मागच्या दाराने प्रवेश अर्थात स्वीकृत 'सदस्य' हा त्यापैकी ॲडजेस्टमेंटचा पर्याय.

### उमेदवारीतून संधी हुकलेल्या कार्यकर्त्यांना सुगीचे दिवस येणार!

राज्यात सध्या आरक्षणामुळे अनेकांची सदस्य होण्याची इच्छा असूनही संधी हुकते. त्यामुळे दुरुस्ती विधयेक येत्या काळात मांडण्यात येणार आहे. जिल्हा परिषद व पंचायत समितीमधील पक्षीय बलाबलाप्रमाणे नियुक्ती करण्यात येणार आहे. त्यामुळे येत्या काळात याठिकाणच्या सदस्यांची संख्या वाढणार आहे.राज्यात एकीकडे १२ जिल्हा परिषद व १२५ पंचायत समितीसाठी निवडणूक प्रक्रिया सुरु आहे. तर अद्याप राज्यातील जवळपास २० जिल्हा परिषदेमधील ओबीसी आरक्षण वाढले असल्याने त्याबाबत कोर्टात सुनावणी सुरु आहे. त्यामुळे या ठिकाणचा निवडणुकीचा कार्यक्रम घोषित करण्यात आलेला नाही. त्यापूर्वीच आता जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी संधी मिळाली नाही, त्यांना आता मागच्या दाराने पुन्हा सदस्य होण्याची संधी या माध्यमातून मिळणार आहे.येत्या काळात लवकरच जर जिल्हा परिषद, पंचायत समितीसाठी स्वीकृत सदस्य नेमणूक करण्याबाबतचा प्रस्ताव मंजूर झाला तर राज्यातील जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्यांची संख्या आता वाढणार आहे. त्यामुळे भाजपने ऐन निवडणूक काळातच अशास्वरूपाची मागणी करीत नवा डाव टाकला असल्याची चर्चा सध्या राजकीय वर्तुळात रंगली आहे.

### जिल्हा परिषदेसाठी १० सदस्यांच्या पाठीमागे एक स्विकृत मेंबर तर पंचायत समित्यांसाठी ५ मेंबराच्या मागे एक स्विकृत सदस्य



येत्या काळात जिल्हा परिषदेमधील दहा सदस्यांमागे एक जण तर पंचायत समितीमधील पाच सदस्यांच्या पाठीमागे एक स्वीकृत सदस्य नेमणूक करण्याबाबतचा प्रस्ताव राज्य सरकारच्या विचाराधीन आहे. त्यासाठी लवकरच घटनादुरुस्ती केली जाणार आहे. ग्रामविकास मंत्रालयाने याबाबतच्या नियमात दुरुस्ती करावी, अशी विनंती करण्यात आली असल्याचे मंत्रि बावनकुळे यांनी सांगितले.

### सोलापूर जिल्हा परिषदेसाठी ६, पंचायत समित्यांसाठी २७ जणांना स्विकृत म्हणून संधी

सोलापूर जिल्हा परिषदेसाठी ६८ गट आहेत. प्रत्येक १० सदस्यांच्या पाठीमागे एक या सुत्राप्रमाणं ६ कार्यकर्त्यांना स्विकृत सदस्य म्हणून जिल्हा परिषदेत एन्ट्री करता येईल, तर पंचायत समित्यांसाठी पाच सदस्यांच्या मागे एक या धोरणाप्रमाणं २७ चेहऱ्यांना स्विकृत म्हणून पंचायत समितीत संधी मिळणार आहे. पक्षीय बलानुसार, ज्या पक्षाचे सदस्य जादा संख्येने निवडून आले आहेत, त्या तुलनेत स्विकृतांचा कोटा त्यांना मिळणार आहे.

### नाराज मत होना, देवाभाऊ है तो... मुमकीन है!

### 'कमळ' फुलविणाऱ्यांच्या मेहनतीचं होणार चीज!



सोलापूर जिल्ह्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भाजपची सुसाट एक्स्प्रेस सुटली आहे. ही एक्स्प्रेस सुसाट सुटण्यसाठी ज्यांचे प्रयत्न झाले, त्यांच्या मेहनतीचं चिज होणार आहे. भाजप जिल्हा परिषदेसह जिल्ह्यात ९ तालुक्यांमध्ये स्व:बळावर निवडणूक लढत आहे. तीन तालुक्यात युती करुन लढत आहे. जिल्हा परिषदेत सत्ता स्थापण्यासाठीचा ३५' चा मॅजिक फिगर गाठण्यासाठी हा पक्ष प्रयत्नशील आहे. सोलापूर महापालिका आणि जिल्ह्यातील नगरपरिषदांसह अनगर नगरपंचायतीमध्ये भाजपला मिळालेलं अभूतपूर्व यश पाहता जिल्हा परिषद आणि नगरपंचायतीच्या निवडणुकांमध्ये भाजप मुसंडी मारेल, असं राजकीय जाणकारांचं म्हणणं आहे. भाजपलादेखील तसा विश्वास आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्ये भाजपची त्सुनामी आल्यास या पक्षाच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून 'स्विकृत'ची भेट मिळू शकते.

दरम्यान प्रत्यक्ष पक्षाच्या उमेदवारींत न्यायनाराज कार्यकर्त्यांना न्याय देण्याची संधी भाजप घेऊन येतंय. निष्ठावंत आणि प्रमाणिक कार्यकर्त्यांना आजवर महापालिका आणि नगरपालिकांमध्ये ज्याप्रमाणे स्विकृत नगरसेवक' होण्याची किंबहुना मागच्या दारानं येण्याची संधी मिळते, त्याप्रमाणं आता जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्येदेखील मागच्या दारानं म्हणजे स्विकृत सदस्य अर्थात निवडणूक न लढवता मेंबर होता येणार आहे. फक्त त्यासाठी कार्यकर्त्याच्या डोकीवर हवा पक्षाच्या गॉडफादरांचा हात. राजकीय घराण्यामधील वारसदारख पक्षाचे नेतेमंडळीं, पुढारी यांच्या कट्टर समर्थकांना मेंबर होण्याची संधी आली आहे, त्यातून त्यांचं राजकीय करिअर उज्वल' होतानाच, नशिब फळाला येणार आहे.

राज्यात भाजपमध्ये मोठ्या प्रमाणावर इनकमिंग' झालं आहे. 'लोटस ऑपेरशन' ही मोहीम फत्ते झाली आहे. येणाऱ्या सर्वांना घ्या' असं धोरण या पक्षाकडून राबवलं जात असल्यानं राज्यात भाजपमध्ये अक्षरश: कार्यत्यांची भरती आली. मुळचे पक्षाचे आणि त्यानंतर इतर पक्षातून घेतलेले यातून भाजपमध्ये उदंड झाले कार्यकर्ते असं वास्तव निर्माण झालं आहे. उदंड झालेल्या सर्वच कार्यकर्त्यांना प्रत्यक्ष निवडणुकीत पक्षाकडून उमेदवारी देणं शक्य झालं नाही. महापालिका, नगरपरिषदा नगरपंचायतींमध्ये ज्याप्रमाणे पक्षीय बलाच्याप्रमाणात स्विकृत नगरसेवक नियुक्त केले जातात. प्रत्यक्ष उमेदवाऱ्या न मिळालेल्या सक्षम चेहऱ्यांना मागच्या दारानं प्रवेश दिला जातो, त्याप्रमाणं आता जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्येदेखील स्विकृत सदस्य नियुक्त केले जाणार आहेत. राज्य सरकारकडून तसा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला जाणार आहे. भाजपनं आपल्या कार्यकर्त्यांसाठी जणू काही गुड न्यूज आणली आहे.

राज्यभरात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांचा माहोल असल्याने राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. त्यातच आता नगरपालिका व महापालिकाप्रमाणेच आता येत्या काळात जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये स्वीकृत सदस्य नेमणूक करण्याबाबतचा प्रस्ताव राज्य सरकारच्या विचाराधीन असल्याचे मोठे विधान भाजपचे नेते व राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले. त्याबाबत आवश्यक ते कायद्यात बदल करण्यात येतील, त्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सकारात्मक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले .

राज्यातील महापालिकामधील स्वीकृत सदस्यांची संख्या वाढवून आता दहा करण्यात आली आहे. त्यामुळे महानगरपालिका निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याची संधी गमावलेल्या नगरसेवकांना आता मागच्या दाराने पुन्हा सभागृहात दाखल होता येत आहे. त्यातच आता येत्या काळात जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये स्वीकृत सदस्य नेमणूक करण्यासाठी दुरुस्ती विधयेक मांडण्याच्या हालचाली सुरु आहेत.

### मग कसं? भाजप म्हणतील तसं!

## बाळराजे किंवा अजिंक्यराणा दिसतील मिनी मंत्रालयात!

**मोहोळ**

अनगर नगरपंचायतीची निर्मिती आणि आरक्षणं यामुळे माजी आमदार राजन पाटील यांच्या परिवारातील कोणीच सदस्य जिल्हा परिषद वा पंचायती समितीच्या निवडणुकीत नाही. मात्र मोहोळ तालुक्यातील मोठं वलय आणि सत्ताधारी भाजपमधील प्रवेश या अनुषंगिक, जिल्हा परिषदेच्या स्विकृत सदस्य पदासाठी राजन पाटील यांच्याकडून खास प्रयत्न होऊ शकतात. भाजपनं त्यांच्या नेतृत्वाची आणि एकूणच वलयाची कदर केली तर बाळराजे किंवा अजिंक्याराणा यापैकी एकास जिल्हा परिषदेत स्विकृत म्हणून संधी मिळू शकते. यापूर्वी बाळराजे पाटील यांनी जिल्हा परिषदेचं उपाध्यक्षपद भूषवलेलं आहे. त्यांना आमदारकीची भूरळ आहे. मात्र तत्पूर्वी स्विकृतवर त्यांनी चान्स मिळू शकतो.

### आरक्षणानं डावललं;

## मात्र स्विकृतनं सावरल्याचं मोहिते-पाटलांबाबत होऊ शकतं चित्र

**माळशिरस**

जिल्ह्याच्या तुलनेत माळशिरस तालुक्यात जिल्हा परिषदेचे गट जादा संख्येने आरक्षणात गेले. त्यातून सोलापूर जिल्ह्याच्या राजकारणातील मातब्बर मोहिते-पाटील घरातील सदस्यांचा मिनी मंत्रालयाचा रस्ता अडला गेल्याचं मानलं गेलं. दोन्ही राष्ट्रवादी एकत्रित येऊन लढताना या पक्षांचे जिल्हा परिषद सदस्य मोठ्या संख्येने निवडून आल्यास पक्षीय बलाच्या आधारे मोहिते-पाटील परिवारातील सदस्यांना जिल्हा परिषदेत स्विकृत सदस्य पदावर संधी निश्चित देण्याच्या हालचाली होऊ शकतात. स्वरुपाराणी मोहिते-पाटील किंवा अन्य सदस्याची जिल्हा परिषदेत एन्ट्री होऊ शकते.

### मालक अन् दादांच्या मर्जीमधील

## इंदुमती अलगोंड-पाटील, हसापुरेंची जिल्हा परिषदेत ग्रँड एन्ट्री?

**दक्षिण सोलापूर**

माजी आमदार दिलीप माने आणि अक्कलकोटचे भाजपचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी इंदुमती अलगोंड-पाटील आणि सुरेश हसापुरे यांना भाजपच्या उमेदवारीवर जिल्हा परिषद करण्यासाठी जोर लावला होता. मात्र सुभाष देशमुख हे दक्षिण सोलापूर तालुक्याचे विद्यमान आमदार असल्याने त्यांनी स्वत:च्या वजनावर माने आणि कल्याणशेट्टींचे मनसुबे ढासळवले. अलगोंड-पाटील आणि सुरेश हसापुरे यांची भाजप उमेदवारीसंबंधीची डाळ शिजू दिली नाही. मात्र स्विकृत सदस्य निवडीच्या नव्या निर्णयातून या दोघांची जिल्हा परिषदेत ग्रँड एन्ट्री होण्यासाठी माने आणि कल्याणशेट्टी तत्कालीनवेळी पुन्हा ताकद लावू शकतात.



### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




सोलापूरकरांना जलपर्णी माहित होती, जलपरी नाही !

कल्याण
457-69-126

मुंबई
158-45-140

### मामा-दीदीची सोंगट्या बसल्यास

## मर्जीमधील कार्यकर्त्याचं चमकेल नशिब

**करमाळा**

करमाळा तालुक्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी माजी आमदार संजयमामा शिंदे आणि बागल गटाच्या नेत्या रश्मी बागल-कोलते यांनी युती केली आहे. राष्ट्रवादी अजित पवार आणि भाजप अशी ती युती मानली जातेय. युतीचे उमेदवार येथे निवडून आल्यास संजयमामा शिंदे आणि रश्मी बागल-कोलते यांच्या खास समर्थकाला जिल्हा परिषदेत प्रवेश मिळू शकतो.

### विठु नगरीचे 'प्रणव'

## दिसतील सोलापूरच्या सिद्धेश्वर पावन नगरीत

**पंढरपूर**

माजी आमदार प्रशांत परिचारक हे भाजपचे पंढरपूर तालुक्यातील नेते आहेत. त्यांच्या पुनर्वसनाचा निर्णय होताना दिसत नाही. पक्षावर तसा त्यांचा ह्या शिल्लक आहे. जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत परिचारक परिवारातील कोणीच सदस्य थेट दिसत नाहीत.मात्र आत्ता प्रणव परिचाकरांना स्वीकृतवर संधी या तालुक्यातून मिळू शकते.

### सुपुत्राच्या राजकारणाला पित्याचा लळा;

## मनीष देशमुखांची झेडपीत रॉयल एन्ट्री?

**दक्षिण-उत्तर सोलापूर**

सोलापूर महापालिकेसह सोलापूर जिल्हा परिषदेची दक्षिण आणि उत्तर सोलापूर तालुक्यातून निवडणूक लढण्याला आमदार सुभाष देशमुख यांचे चिरंजीव मनीष देशमुखांना अडचणी आल्या. लोकप्रतिनिधी होण्याचे त्यांचे मनसुबे जणू काही ढासळले. मात्र त्यांची 'मनिषा' पूर्ण होण्याच्यादृष्टीनं भाजपनं त्यांच्यासारख्या अनेक कार्यकर्त्यांसाठी 'स्वीकृत' सदस्य होण्याचे अच्छे दिन आणलेत. यातून मनीष देशमुखांचा प्रवेश जिल्हा परिषदेत मागच्या दारानं होऊ शकतो.

### सत्तेच्या वाट्यात सांगोल्यात कोणाचं चांगभलं?

## शहाजीबापू, जयाभाऊ कोणाच्या नावाला लावतील मोहर

**सांगोला**

सांगोला तालुक्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समितीची निवडणूक भाजप आणि शिंदेसेना हे युती करुन लढत आहेत. युतीच्या माध्यमातून या तालुक्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समितीचे उमेदवार मोठ्या संख्येने निवडून आल्यास या तालुक्यातून 'स्वीकृत'वर संधी देण्याचा विषय येणार हे निश्चित. त्यावेळी माजी आमदार शहाजी पाटील आणि पालकमंत्री जयकुमार गोरे हे दोघे कोणाच्या नावावर मोहर उमटवणार, याचं उत्तर येणाऱ्या काळाकडं असू शकतं.



### जयाभाऊ अन् सचिनदादांची येथे चालेल मर्जी

सोलापूर शहराबरोबरच जिल्ह्याच्या एकूणच राजकारणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यानंतर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे आणि अक्कलकोट भाजपचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांची सध्या चलती आहे. सोलापूर जिल्हा परिषद आणि जिल्ह्यातील ११ पंचायत समित्यांमध्ये स्वीकृत नगरसेवक निवडण्याचा विषय येईल, तेव्हा निश्चितपण गोरे आणि कल्याणशेट्टी यांची मर्जी चालेल. त्यांनी शिफारस केलेले चेहरे हे 'त्या' 'त्या' ठिकाणी नियुक्त होतील, असं मानलं जातंय.

